जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२४ | मंगळवार, १० मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


# सभापतीपदी युवराज काकडे तर उपसभापतीपदी विद्या गायकवाड

## हवेली पंचायत समितीवर राष्ट्रवादीचा झेंडा

**लोणी काळभोर, ता. ९ :** पुणे जिल्ह्यात प्रतिष्ठेची मानली जाणारी हवेली पंचायत समिती अखेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात गेली आहे. सभापतीपदी युवराज हिरामण काकडे तर उपसभापतीपदी अपक्ष सदस्य विद्या दत्तात्रय गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली. या निवडी मुळे हवेली तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवा रंग चढला असून अपक्षाच्या पाठिंब्यामुळे राष्ट्रवादीला सत्ता स्थापन करण्यात यश आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

हवेली पंचायत समितीच्या सभागृहात सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया सोमवारी (ता. ९) पार पडली. सभापतीपदासाठी युवराज काकडे तर उपसभापतीपदासाठी विद्या गायकवाड यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. अर्जांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांनी दोघांचीही बिनविरोध




निवड झाल्याची घोषणा केली. निवड जाहीर होताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि उपस्थित सदस्यांनी दोघांचे अभिनंदन केले. पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेश घुले, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, राष्ट्रवादीचे हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, यशवंत कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप, संचालक संतोष कांचन, माजी सरपंच अण्णा महाडिक, नंदू काळभोर, सुरज चौधरी, पंचायत समिती सदस्य मनोज ऊर्फ कृषीराज चौधरी, कोमल कांबळे, सुषमा मुरकुटे, अमोल टेकाळे, युवराज वांजळे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, नवीन उपसभापती विद्या गायकवाड यांनी सभागृहातील सर्व

> हवेली तालुक्यातील विकासकामांना गती देण्यासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम केले जाईल. गावागावातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांवर विशेष भर देत तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील.
> - **युवराज काकडे,** सभापती (हवेली पंचायत समिती)

सदस्यांच्या सहकार्याने तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी निधी मिळवून देण्यासही युवराज काकडे यांनी पुढाकार घेतला. पंचायत समिती निवडणुकीत त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत आपली राजकीय ताकद दाखवून दिली. राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्यावर विश्वास दाखवत हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदाची जबाबदारी दिली असून आरोग्यदूत ते सभापती असा त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### आरोग्यदूत ते सभापतीपदी भरारी

युवराज काकडे यांना राजकीय वारसा लाभलेला आहे. त्यांचे वडील हिरामण काकडे यांनी पंचायत समिती सदस्य म्हणून काम पाहिले आहे, तर आई छाया काकडे यांनी थेऊर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची धुरा सांभाळली आहे. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना राजकारणाचे धडे घरातूनच मिळाले.राजकीय कारकिर्दीची सुरुवात करत त्यांनी थेऊर ग्रामपंचायतीचे सदस्यपद भूषवले. त्यानंतर त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या सहकार्याने पुणे जिल्ह्यातील शेकडो गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय मदत मिळवून देण्याचे कार्य केले. या कामामुळे त्यांची आरोग्यदूत अशी ओळख जनमानसात निर्माण झाली.

### अपक्षाच्या पाठिंब्याने सत्तेची गणिते जुळली

हवेली पंचायत समितीवर सत्ता स्थापन करण्यासाठी ७ सदस्यांचा मॅजिक फिगर आवश्यक होता. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला ६ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी एक जागेची कमतरता राष्ट्रवादीसमोर होती. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ नेत्यांच्या बैठका व राजकीय हालचालींना वेग आला. अखेर अपक्ष सदस्य विद्या दत्तात्रय गायकवाड यांनी राष्ट्रवादीला पाठिंबा जाहीर केला.

त्यांच्या पाठिंब्या मुळे राष्ट्रवादीचे संख्याबळ ७ वर पोहोचले आणि सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर राष्ट्रवादीने रणनीती आखत गायकवाड यांना उपसभापतीपदाची संधी देत सत्ता समीकरणे पक्की केली.

## संक्षिप्त

### मुळशीत गुंतवणुकीच्या नावाखाली फसवणूक

**पिंपरी, ता. ९ :** मुळशी तालुक्यातील माण येथे गुंतवणुकीवर परताव्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाने शेकडो गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत एका व्यक्तीने हिंजवडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार रमेश आहेरकर, महिला आरोपी, वेदांत आहेरकर, आदित्य आहेरकर (रा. शुभारंभ रेसिडेन्सी, माण, मुळशी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी शेअर मार्केट तसेच भिशीमध्ये दरमहा ४ ते ५ टक्के जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादींचे ५७ लाख ६ हजार रुपये आणि इतर गुंतवणूकदारांचे ३ कोटी ५९ लाख १४ हजार ८९२ रुपये असे एकूण ४ कोटी १६ लाख २० हजार ८९२ रुपये जमा केले. कोणतीही रक्कम परत न करता गुंतवणूकदारांची फसवणूक केली.





### बावधन येथे महाविद्यालयीन तरुणाला मारहाण

**बावधन, ता. ९ :** बावधन परिसरात दुचाकीवरून जात असलेल्या महाविद्यालयीन तरुणांना फ्लेम युनिव्हर्सिटी समोरील गौरव फुड कोर्ट, लवळे येथे अडवून काही तरुणांनी मारहाण केल्याची घटना घडली.

भुवन आरका (वय-१९, रा. फ्लेम युनिव्हर्सिटी एल ब्लॉक, लवळे. मूळ- हैद्राबाद) या विद्यार्थ्याने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार जयेश शितोळे, श्रीनाथ शितोळे, सिद्धार्थ शितोळे आणि अभिषेक सातव (रा. सर्व लवळे, मुळशी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी आणि त्यांचा मित्र पेट्रोल भरून विद्यापीठात परतत असताना आरोपींनी आपसात संगनमत करून दोघांना शिवीगाळ आणि दमदाटी केली, तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले.

# नारायणवाडीतील पिंजऱ्यात एक बिबट्या जेरबंद; दुसऱ्याचा शोध सुरू

**जुन्नर, ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात बिबट्यांचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. नारायणगावजवळील नारायणवाडी परिसरात फिरणाऱ्या दोन बिबट्यांपैकी एकाला वनविभागाने पिंजऱ्यात पकडण्यात यश मिळवले असून दुसऱ्या बिबट्याचा शोध अद्याप सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



वनविभागाला नारायणवाडी परिसरात दोन बिबटे फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने त्या भागात पिंजरा लावून सापळा रचण्यात आला होता. सोमवारी सकाळी त्यापैकी एक बिबट्या पिंजऱ्यात अडकला. वनविभागाच्या पथकाने त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले असून पुढील कार्यवाही सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पकडलेल्या बिबट्याने परिसरातील अनेक पाळीव प्राण्यांवर हल्ले केल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये मोठी दहशत पसरली होती. मात्र परिसरात आणखी एक बिबट्या असल्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने वनविभागाचे पथक त्याचा शोध घेत आहे. उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. ऊसतोडीनंतर शेतांमधील त्यांची आश्रयस्थाने कमी झाल्याने बिबटे गावांच्या दिशेने येत असल्याचे वनविभागाने सांगितले आहे. अलीकडे मानवांवर हल्ल्यांच्या घटना कमी असल्या तरी पाळीव प्राण्यांवर हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. दरम्यान, जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रावरही मोठा ताण वाढत आहे. आतापर्यंत या परिसरातून १०० हून अधिक बिबटे पकडण्यात आले असून काही दिवसांपूर्वी या केंद्रातील २० बिबटे गुजरातमधील वनतारा वाइल्डलाईफ रेस्क्यू आणि रिहॅबिलिटेशन सेंटर येथे हलवण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर माणिकडोह येथे सुमारे दोन ते अडीच एकर जागेवर नवीन बिबट निवारा केंद्र उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. तोपर्यंत पकडलेल्या बिबट्यांची देखभाल आणि अन्नपुरवठा करणे हे वनविभागासमोर मोठे आव्हान ठरत आहे. दरम्यान, नागरिकांनी सावध राहावे, रात्री एकटे बाहेर पडू नये तसेच बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतीय क्रिकेट संघात संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ : मुख्यमंत्री

**मुंबई, ता. ९ :** आयसीसी मेन्स टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत संघाच्या कामगिरीचे कौतुक केले.

भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत एक अपवाद वगळता सर्व सामने जिंकत वर्चस्व गाजविले. संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ संघात पाहायला मिळाला. या कामगिरीबद्दल भारतीय संघाचे कर्णधार सूर्यकुमार यादव तसेच प्रशिक्षक गौतम गंभीर यासह सर्व संघाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर यांनी संमत केल्याचे घोषित केले.



विशेष अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय क्रिकेटचा गौरवशाली इतिहास कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील संघाने १९८३ मध्ये लॉर्ड्स येथे पहिला विश्वचषक जिंकल्यापासून सुरू झाला. त्यानंतर महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने २००७ मध्ये पहिला टी-२० विश्वचषक आणि २०११ मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकला. आता २०२४ आणि २०२६ मध्ये पुन्हा टी-२० विश्वचषक जिंकून भारताने क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे हे मुंबईचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुंबई आणि महाराष्ट्राने भारतीय क्रिकेटला अनेक महान खेळाडू दिले असून ग्रामीण आणि सामान्य कुटुंबांतील खेळाडू आज आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळ यांच्या कार्याचाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. विधानसभेच्या वतीने भारतीय संघाला अभिनंदनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कालच्या अंतिम सामन्यातील या विजयासह भारताने तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकत नवा इतिहास रचला असून तीन वेळा ही स्पर्धा जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. तसेच सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याची कामगिरीही भारताने प्रथमच केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम या जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने २० षटकांत ५ बाद २५५ धावांचा विक्रमी डोंगर उभा केला. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील हा आजपर्यंतचा सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडचा डाव १५९ धावांत गुंडाळत शानदार विजय मिळविला असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# पोलीस दल महिला सुरक्षेसाठी कटिबध्द : पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे

**लोणी काळभोर, ता. ९ :** पुणे शहर पोलीस हे महिलांच्या सुरक्षेसाठी कटिबध्द आहे. पोलीस महिलांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर आहेत. आज महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर राहून काम करत आहेत. महिलांना कुठल्याही क्षेत्रात काम करण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी पोलीस दल शंभर टक्के मदत करत आहे असे प्रतिपादन लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी केले.



जागतिक महिला दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ग्रामपंचायत महिला स्वच्छता कर्मचारी, महिला पोलीस पाटील, महिला दक्षता समिती व महिला नागरिकांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन रविवारी (ता.८) करण्यात आले होते. यावेळी राजेंद्र पन्हाळे बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे, उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, योगेश पैठणे, महिला पोलीस कर्मचारी, महिला पोलीस पाटील प्रियंका भिसे (कदमवाकवस्ती), रेश्मा कांबळे (थेऊर), सोनाली शिवरकर (आळंदी म्हातोबाची) आदी उपस्थित होत्या.

दरम्यान, या आरोग्य शिबीरात परिसरातील महिलांनी सहभाग घेतला. यावेळी पोलीस ठाण्याच्या वतीनेच सर्व उपस्थित महिलांच्या आरोग्यांची तपासणी करून पुष्पगुच्छ देऊन मानसन्मान करण्यात आला. या वेळी महिला दक्षता समितीच्या सदस्या स्मिता नॉर्टन, आळंदी म्हातोबाची अंगणवाडीच्या सेविका आशा भंडलकर व कुशुभ्रा रवि आहेर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिलांच्या आरोग्यांची तपासणी विश्वराज हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आली.

# रायगडावरून मनसेची नव्या पर्वाला सुरुवात; राज ठाकरे यांच्या हस्ते सदस्य नोंदणीचा शुभारंभ

**रायगड, ता. ९ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण होत असताना ऐतिहासिक रायगडाच्या पायथ्याशी पक्षाच्या नव्या टप्प्याची दमदार सुरुवात करण्यात आली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांच्या आशीर्वादाने पक्षाच्या राज्यव्यापी सदस्य नोंदणी मोहिमेचा शुभारंभ केला.

दरवर्षी पक्षाचा वर्धापन दिन हॉल किंवा बंदिस्त जागेत साजरा केला जात असला तरी यंदा राज ठाकरे यांनी वेगळा निर्णय घेत ऐतिहासिक रायगड किल्ला या पवित्र स्थळाची निवड केली. ९ मार्च हा वर्धापन दिन असला



तरी १९ मार्चला गुढीपाडव्याच्या मेळाव्यात सर्व राजकीय भूमिका मांडणार आहे. आज केवळ सदस्य नोंदणीची मोहीम सुरू करतो, असे स्पष्ट करत त्यांनी कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. मनसे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना राज ठाकरे म्हणाले, नुसते सदस्य होऊन चालणार नाही, तर सक्रिय सदस्य व्हा. शाळा, महाविद्यालये, मंदिर परिसर, बाजारपेठ अशा वर्दळीच्या ठिकाणी सदस्य नोंदणीचे स्टॉल उभारा. लोकांपर्यंत पोहोचा, त्यांच्याशी संवाद साधा. हजारो लोक पक्षात येण्यासाठी उत्सुक आहेत; त्यांना सक्रिय सदस्य बनवा.

ते पुढे म्हणाले, आज महाराजांच्या आशीर्वादाने रायगडावरून या मोहिमेची सुरुवात करत आहोत. हा संदेश संपूर्ण राज्यभर पोहोचवा. १९ मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी शिवाजी पार्क येथे होणाऱ्या मेळाव्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्व मनसैनिकांनी उपस्थित राहावे. विशेष म्हणजे, वर्षांपूर्वीही राज ठाकरे यांची पहिली सभा १९ मार्चलाच झाली होती. दोन दशकांनंतर पुन्हा त्याच दिवशी गुढीपाडव्याचा मेळावा होणे हा योगायोग असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, रायगड ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीची आणि शिवराज्याभिषेकाची साक्ष देणारी पवित्र भूमी असल्याने याच ठिकाणावरून सदस्य नोंदणीला सुरुवात करण्याला विशेष प्रतीकात्मक महत्त्व असल्याचे सांगितले जात आहे. मनसेच्या २० वर्षांच्या प्रवासानंतर पक्ष संघटनाला नवी ऊर्जा देण्यासाठी ही राज्यव्यापी मोहीम राबवली जाणार असून डिजिटल तसेच प्रत्यक्ष नोंदणीच्या माध्यमातून सदस्यसंख्या वाढवण्याचा निर्धार पक्षाने व्यक्त केला आहे.

संक्षिप्त





## भारतीय संघाचे पंतप्रधानांकडून कौतूक

**गुजरात, ता. ९ :** भारतीय पुरुष क्रिकेट संघाने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास रचला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा पराभव केला. या ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी, अमित शाह अशा अनेक प्रमुख नेत्यांनी भारतीय संघाचे अभिनंदन केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी सोशल मिडियावर केलेल्या पोस्टमध्ये, चॅम्पियन्स!आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक जिंकल्याबद्दल भारतीय संघाचे अभिनंदन! हा उल्लेखनीय विजय अफाट कौशल्य, दृढनिश्चय आणि सांघिक कामगिरीचे दाखवून देतो आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने विलक्षण धैर्य दाखवून दिले आहे. या विजयाने प्रत्येक भारतीयाचे हृदय अभिमान आणि आनंदाने भरून आले आहे. वेल डन, टीम इंडिया! म्हटले आहे.

## राज्यात नियम तोडणाऱ्या रुग्णालयांना नोटीस



पुणे, त. ९ : शासनाच्या महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियमानुसार रुग्णालयांना उपचारांचे दरपत्रक दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे रुग्ण हक्क सनद लावणेही बंधनकारक आहे. मात्र रुग्णालयांकडून सर्रास हे नियमधाब्यावर बसविले जातात. याविरोधात सरकारच्या आरोग्य विभागाने केलेल्या तपासणीत ४५३८ रुग्णालये दोषी आढळली असून त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. यातील सहा रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. शुश्रुषागृह नोंदणी नियमांनुसार नियमांचे रुग्णालयांकडून पालन होते की नाही याबाबत श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. अनेक ठिकाणी खासगी रुग्णालयांकडून त्याची अंमलबजावणी केली जात नसल्याचे व दरपत्रकांमध्ये अनेक ठिकाणी दरभिन्नता असल्याचे दिसून आले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणली. यावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या उत्तरात ही माहिती समोर आलीय.

## चिंचवड येथे तडीपार गुंडाला शस्त्रासह अटक




**चिंचवड, ता. ९ :** दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आलेला एक गुंड बंदी आदेशाचे उल्लंघन करून चिंचवड येथील खदानीजवळ शस्त्र बाळगताना पोलिसांना सापडला. पोलीस शिपाई नंदलाल राऊत यांनी या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ऋषिकेश महानवर (वय २५, रा. मोरेवस्ती, चिखली) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीला ऑक्टोबर २०२४ मध्ये पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. तरीही तो कोणतीही परवानगी न घेता शहरात आला आणि लोखंडी कोयता घेऊन गुन्हा करण्याच्या उद्देशाने शंकरनगर चिंचवड येथील खदानीजवळ आला. माहिती मिळताच पोलिसांनी त्याला अटक केली.

## दोन वाहनांच्या धडकेत चालक जखमी

**चाकण, ता. ९ :** चाकण परिसरातील रोहकल रोडवरील क्रेशर पॉईंटसमोर दोन वाहनांची धडक होऊन एका चालकाला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. रमेश व्यवहारे (वय-२५, रा. सहारा सिटी, चाकण. मूळ- छत्रपती संभाजीनगर) या जखमी चालकाने फिर्याद दिली आहे. राहुल जाधव (वय-३३, रा. राक्षेवाडी, चाकण) असे आरोपी चालकाचे नाव आहे. फिर्यादी त्यांच्या वाहनाने चाकणकडे जात असताना समोरून येणाऱ्या पिकअपने त्यांना धडक दिली. या धडकेत फिर्यादींच्या गाडीचे नुकसान झाले असून त्यांच्या उजव्या पायाच्या बोटाला गंभीर दुखापत झाली आहे.

## स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय; एकास अटक

**हिंजवडी, ता. ९ :** हिंजवडी येथील एका स्पा सेंटरमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई करत एकाला अटक केली. ही कारवाई शुक्रवारी (ता. ०६) रात्री करण्यात आली. या प्रकरणी महिला पोलीस हवालदार निलम बुचडे यांनी फिर्याद दिली असता वासुदेवन पिल्लेय (वय-४१, पाषाण रस्ता, पुणे) या स्पा मॅनेजरला अटक करण्यात आली. आरोपी स्पा सेंटरच्या नावाखाली महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होता.

# लोकसभा अध्यक्षांची भूमिका पक्षपाती, राहुल गांधींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न : वडेट्टीवार

**मुंबई, ता. ९ :** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी लोकसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर टीका करताना सांगितले की, लोकसभा स्पीकरच्या खुर्चीवर बसणारा व्यक्ती कोणत्याही पक्षाचा म्हणून पाहिला जात नाही. त्या पदावर बसल्यानंतर त्याने निष्पक्षपणे काम करणे अपेक्षित असते. मात्र विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलूच दिले जात नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, विरोधी पक्षनेत्यांनी सरकारविरोधात एक शब्दही बोलू नये अशी अडेलतट्टू आणि आडमुठेपणाची भूमिका सभागृहात घेतली जात असल्याचे संपूर्ण देशाने पाहिले आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांनुसार विरोधी पक्षालाही भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षाचीही देशातील सुमारे १४० कोटी जनतेला न्याय देण्याची जबाबदारी असते. मात्र सभागृहात पूर्णपणे एकतर्फी कारभार सुरू असल्यानेच विरोधी पक्षांना लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव आणावा लागला, असे त्यांनी सांगितले.

वडेट्टीवार म्हणाले की, देशातील १४० कोटी जनतेवरील अन्यायाविरोधात लढण्याचे काम विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी करत आहेत आणि ते आपली भूमिका ठामपणे मांडत आहेत. सरकार त्यांना घाबरते आहे आणि त्यामुळेच त्यांचा आवाज दाबण्याचे प्रयत्न वारंवार सभागृहात होताना दिसत आहेत. त्यामुळे काय होईल ते होईल, पण ओम बिर्ला यांची भूमिका पक्षपाती असल्याचे आता लपून राहिलेले नाही. त्यासाठीच विरोधी पक्षांनी अविश्वासाचा प्रस्ताव आणला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



विधानसभेच्या अधिवेशनाबाबत बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, सध्या अधिवेशनाचा तिसरा आठवडा सुरू आहे. विरोधी पक्षाचे संख्याबळ कमी असले तरी सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नुकतेच सादर झालेले बजेट चर्चेसाठीही योग्य नसल्याची टीका त्यांनी केली.

वडेट्टीवार म्हणाले की, देश कंगाल झाला आहे आणि महाराष्ट्राची आर्थिक स्थितीही अत्यंत चिंताजनक झाली आहे. महाराष्ट्र जवळपास भिकारी झाला असून राज्याची परिस्थिती पूर्णपणे ढासळलेली आहे. या बजेटमध्ये सर्वसामान्यांसाठी काहीच नसून ते केवळ रस्ते बांधण्यासाठी आहे. उद्योगपती आणि कंत्राटदारांना फायदा व्हावा यासाठीच हा अर्थसंकल्प तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने केवळ कागदोपत्री कर्जमाफीचा दिखावा केला असून प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा देणारी कोणतीही ठोस तरतूद या बजेटमध्ये नाही, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र सध्या मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली आहे.

दरवर्षी सुमारे ६७ हजार कोटी रुपये केवळ व्याजासाठी द्यावे लागत आहेत. राज्याचा अर्थसंकल्प तुटीचा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत भांडवली खर्च फक्त १२ हजार कोटी रुपयांनी वाढवण्यात आला आहे. यावरून महाराष्ट्राची अधोगती सुरू असल्याचे स्पष्ट दिसत असल्याची टीकाही त्यांनी केली.

## दुचाकीच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पुणे, ता. ९ :** तळेगाव-चाकण रस्त्यावर दुचाकीने दिलेल्या धडकेत ५२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. इंदोरी येथील हॉटेल शिवप्रसाद समोर घडली. मुक्ताबाई घरदाळे (वय ५२, रा. वाघजाईनगर, खराबवाडी) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. रोहित गायकवाड (वय २७, रा. खराबवाडी, खेड. मूळ- जामखेड) यांनी या प्रकरणी तळेगाव एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दुचाकी वरील अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


फिर्यादी त्यांची मावशी मुक्ताबाई घरदाळे यांना दुचाकीवरून घेऊन जात होते. यावेळी समोरून येणाऱ्या चालकाने अविचाराने गाडी चालवून त्यांच्या धडक दिली. या अपघातात मुक्ताबाई यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर चालक फरार आहे.

# व्हीएसआर कंपनीचे संचालक व्ही. के. सिंग यांची सीआयडीकडून चौकशी

**पुणे, ता. ९ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघात प्रकरणात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीआयडी) व्हीएसआर कँपनीचे संचालक व्ही. के. सिंग यांची गुरुवारी चौकशी करण्यात आली. अजित पवार यांचा बारामतीत विमान अपघातात मूत्यू झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे २८ जानेवारी रोजी मुंबईहून बारामतीकडे विमानातून निघाले होते. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी ते बारामतीत आले होते. एकाच दिवशी त्यांच्या बाराम ती परिसरात चार सभा होणार होत्या. सकाळी आठच्या सुमारास मुंबईहून विमानाने उड्डाण केल्यानंतर बारामती विमानतळावर विमान उतरण्याच्या तयारीत असताना अपघात झाला.





या अपघातात पवार यांच्यासह वैमानिक सुमित कपूर, सहवैमानिक शांभवी पाठक, अटेंडंट पिंकी माळी, पवार यांचा अंगरक्षक विदीप जाधव यांचा मृत्यृ झाला. विमान अपघात प्रकरणाची नोंद बारामती पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बारामती पोलीस ठाण्यातील दाखल प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू करण्यात आला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर वैमानिक, तसेच वैमानिकाचा हलगर्जीपणा किंवा घातपात असा संशय व्यक्त केला असताना आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदा घेऊन विमान कंपनीवर गंभीर आरोप केले होते. डीजीसीए (डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन), तसेच एएआयबी (एअरक्राफ्ट क्सिडेन्ट इन्व्हीस्टीगेशन ब्युरो) यांच्या तपासाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (५ फेब्रुवारी) व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीचे संचालक व्ही. के सिंग यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते.

दरम्यान, व्ही. के सिंग हे गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास त्यांचा मुलगा रोहीत यांच्यासह सीआयडीच्या पाषाण रस्त्यावरील कार्यालयात आले. विमानाची ऑपरेशन प्रक्रिया, मेंटेनन्स रेकॉर्ड, तांत्रिक बाबी, सुरक्षा नियमांचे पालन, अपघाताशी संबंधित अन्य मुद्द्यांबाबत त्यांच्याकडे सविस्तर चौकशी करण्यात आली, अशी माहिती सीआयडीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.



## मी ही ट्रॉफी तीन दिग्गजांना समर्पित करतो : गौतम गंभीर

**गुजरात, ता. ९ :** भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने अजून एका आयसीसी ट्रॉफीचं जेतेपद पटकावलं. हे जेतेपद पटकावत भारतीय संघाने अनेक विक्रम आपल्या नावावर करून घेतले आहेत. दरम्यान, यासर्वात गौतम गंभीरने संघाने जिंकलेली ट्रॉफी भारतीय खेळाडूंना समर्पित केलीय. याविषयी बोलताना गौतम गंभीरने, मी ही ट्राफी राहुल द्रविड, व्हीव्हीएस लक्ष्मण व अजित आगरकर यांना समर्पित करतो. राहुल द्रविडला कारण त्यांनी त्यांच्या कार्यकाळात ज्याप्रकारे संघ घडवला आहे. लक्ष्मण यांना कारण त्यांनी पडद्यामागून भारतीय क्रिकेटसाठी जे अनकंडिशनल कष्ट घेतले आहेत. बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स हे टीम इंडियासाठी पाईपलाईन राहिली आहे आणि अजित आगरकर कारण ज्या प्रामाणिकपणे त्यांनी आपलं काम केलं आहे. असे म्हटले.

# राज्यात ९ मार्चपासून नवीन ऑटो-रिक्षा व टॅक्सी परवान्यांना स्थगिती


**मुंबई, ता. ९ :** राज्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यभरात ९ मार्चपासून नवीन ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी परवाने देण्यास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी उपस्थित होते. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत लवकरच नवीन ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी परवाने कोणत्या निकषांवर द्यावेत याबाबत सविस्तर निर्णय घेतला जाणार असून त्या आधारे पुढील धोरण निश्चित केले जाणार आहे.




सध्या राज्यभरात अंदाजे १४ लाखांहून अधिक ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी परवाने दिले गेले आहेत. महाराष्ट्रातील पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये या परवान्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारकडे आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयानेही स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला राज्य शासनाला दिला आहे.

परिवहन विभागाकडून यासंदर्भात केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर केंद्र सरकारने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे राज्य सरकारला आवश्यक निर्णय घेण्याचा अधिकार स्पष्ट केला आहे. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ६७(३) नुसार राज्य सरकारांना प्रवासी आणि मालवाहतूक परवान्यांमध्ये बदल करण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार आहे.



## टीम इंडियाचा इतिहास रचत विश्वविजेतेपदावर शिक्कामोर्तब

**गुजरात, ता. ९ :** टीम इंडियाने टी-२० वर्ल्ड कपमध्ये पुन्हा एकदा इतिहास रचत विश्वविजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह भारताने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला असून एकूण तिसऱ्यांदा ही प्रतिष्ठेची ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे. या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारत असा पराक्रम करणारा पहिलाच संघ ठरला आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत विश्वचषकावर आपले नाव कोरले. यासह पुन्हा एकदा क्रिकेटविश्वावर आपला दबदबा सिद्ध केला. भारताने यापूर्वी २००७ साली कर्णधार महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली पहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर तब्बल १७ वर्षांनी २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने पुन्हा एकदा हा किताब पटकावला.

आता २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकत इतिहासात लिहिला. या विजयासह भारताने क्रिकेटच्या इतिहासात आता एकूण पाच विश्वचषकांची नोंद झाली आहे. त्यामध्ये एकदिवसीय विश्वचषकाचे दोनआणि टी-२० विश्वचषकाचे तीन किताब समाविष्ट झाले आहेत.


# समर्थ क्रॉप केअर घोटाळा : मुख्य सूत्रधार प्रशांत गवळी अटकेत; सहकारी अजूनही मोकाट, पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**लोणी काळभोर, ता. ९ :** समर्थ क्रॉप केअर कंपनीच्या नावाखाली शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांना प्रतिमहिना तब्बल १० टक्के परताव्याचे आमिष दाखवत कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रशांत गवळी याला अखेर पुणे शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. अटक केल्यानंतर गवळीला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. मात्र या घोटाळ्यातील इतर प्रमुख सहकारी अजूनही पोलिसांच्या कारवाईपासून दूर असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याप्रकरणी लक्ष्मी विजय बर्लाल (वय ६१, रा. सोमवार पेठ, पुणे) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार समर्थ क्रॉप केअर कँपनीचा संचालक प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), ३१६ (५), ३ (५), ६१ (२) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणुकीच्या घोटाळ्यात प्रशांत गवळीची पत्नी ज्योती प्रशांत गवळी, नागनाथ धोंडिबा जाधव, पंडित राठोड, दीपक कटारे, चंद्रकांत राऊत, अविष्कार सुरवसे (रा. बिजली नगर, पुणे), तसेच सुदामा दास, मोनीषा सुदामा पाने उर्फ दास, प्रकाश मंगाने (रा. सिंहगड रोड) आणि जोतीबा महादेव काटकर (रा. हडपसर) यांचाही सहभाग असल्याची तक्रारीत नोंद आहे. मात्र या सर्वांविरोधात अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने मुख्य आरोपी अटकेत असताना इतर सहकारी मोकाट कसे? असा सवाल गुंतवणूकदारांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे, अहिल्यानगर, सोलापूरसह राज्यातील १२ हून अधिक जिल्ह्यातील ४० ते ४५ हजाराहून अधिक गुंतवणूकदारांनी ४ ते ५ हजार कोटी रुपयांची बेकायदा रक्कम गोळा केली आहे. या संपूर्ण घोटाळ्याचा सुरुवातीपासून सातत्याने पाठपुरावा पुणे प्राईम न्यूजने केला. गुंतवणूकदारांची मुद्दल अथवा परतावा






देणे शक्य न झाल्याने सप्टेंबर २०२५ महिन्यात ही संस्था दिवाळखोरीत गेली. त्यानंतर गुंतवणूकदारांना एक दमडीही मिळालेली नाही. गवळी यांच्याकडून पैसे देण्याऐवजी गुंतवणूकदारांना केवळ आश्वासने दिली आहेत.

पुणे प्राईम न्यूजने समर्थ क्रॉप केअर कंपनीच्या संशयास्पद व्यवहारांबाबत वेळोवेळी बातम्या प्रसिद्ध करून जनजागृती केली. या बातम्यांमुळे अनेक संभाव्य गुंतवणूकदार सावध झाले आणि मोठ्या प्रमाणात होणारी आर्थिक फसवणूक टळली आहे. समाजहिताच्या दृष्टीने केलेल्या या पत्रकारितेमुळे अनेकांचे संसार वाचल्याची प्रतिक्रिया गुंतवणूकदारांकडून व्यक्त होत आहे. मात्र पोलीस प्रशासनाकडून अद्यापही या घोटाळ्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही. व इतर आरोपींवर देखील कारवाई न केल्या मुळे गुंतवणूकदार गोंधळात सापडले आहेत. तसेच आपले पैसे मिळणार की नाहीत या संभ्रमात अडकले आहेत.

दरम्यान, आता काही संबंधित स्वयंमघोषित नेत्यांकडून पुणे प्राईम न्यूजने पैसे घेतले असा बिनबुडाचा आरोप केला जात आहे. मात्र याबाबतचे कोणतेही ठोस पुरावे नसल्याचे स्पष्ट झाले आहे. उलट, संबंधित कंपनीच्या एका कथित एजंटनेच केलेल्या संभाषणाच्या रेकॉर्डिंगमध्ये पुणे प्राईम न्यूजने कधीही पैसे मागितले नाहीत किंवा घेतले नाहीत असे बोलल्याचा ऑडिओही व्हायरल झाला होता. पैसे घेतले असते तर या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा झाला नसता आणि घोटाळ्याचा पर्दाफाशही झाला नसता, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे विनाकारण बदनामी करण्याऐवजी संबंधितांनी स्वत: आत्मपरीक्षण करण्याची खरी गरज असल्याचीही चर्चा सध्या सुरू आहे.

### पत्रकारांना धमक्यासुद्धा दिल्या

या घोटाळ्याचा पर्दाफाश केल्यानंतर पुणे प्राईम न्यूजचे संपादक व पत्रकारांना फोन व एसएमएसद्वारे धमक्या दिल्याचेही समोर आले आहे. प्रशांत गवळी व त्याच्या कथित एजंटांकडून बातम्या थांबविण्यासाठी विविध प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. मात्र या धमक्यांना न जुमानता पुणे प्राईम न्यूजने निडर पत्रकारितेची भूमिका कायम ठेवत हा महाघोटाळा राज्यासमोर आणला आहे.

### सहआरोपींवर कारवाई कधी?

मुख्य आरोपी अटकेत असताना इतर आरोपींवर कारवाई का होत नाही, असा सवाल गुंतवणूकदार व नागरिकांकडून उपस्थित होत आहे. त्यामुळे या संपूर्ण घोटाळ्याचा तपास सखोल करून सर्व आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**घोटाळा उघडकीस आणला म्हणूनच पुणे प्राईम न्यूजवर स्वयंमघोषित नेत्यांकडून बिनबुडाचे आरोप**

समर्थ क्रॉप केअर या कथित कंपनीचा घोटाळा उघडकीस आणण्यात पुणे प्राईम न्यूजने निर्णायक भूमिका बजावली. घोटाळ्याचा भांडाफोड होत असताना स्वयंम घोषित नेत्यांकडून बातम्या करू नका म्हणून विविध प्रकारच्या विनंत्या आणि फर्माईशी केल्या जात होत्या. परंतु, कोणत्याही दबावाला किंवा अमिषाला बळी न पडता पुणे प्राईम न्यूजने समाज हिताची तटस्थ भूमिका कायम ठेवत हा संपूर्ण घोटाळा जनतेसमोर आणला.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले टीम इंडियाचे अभिनंदन



**मुंबई, ता. ९ :** अहमदाबाद येथे झालेल्या टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडचा ९६ धावांनी दारुण पराभव करत तिसऱ्यांदा विश्वचषकावर आपले नाव कोरले. सलग दुसऱ्यांदा विजय मिळवत या ऐतिहासिक कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन केले आहे.

अंतिम सामन्यात भारतीय खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर जबरदस्त कामगिरी केली. न्यूझीलंडसारख्या बलाढ्य संघाला ९६ धावांच्या मोठ्या फरकाने हरवून भारताने आपले वर्चस्व पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे.

या विजयानंतर आनंद व्यक्त करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, भारतीय संघाने आज दाखवलेली जिद्द आणि सांघिक खेळ वाखाणण्याजोगा आहे. फायनलमध्ये मिळवलेला हा विजय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. या यशाने देशात पुन्हा एकदा दिवाळी साजरी होत आहे. कर्णधार आणि सर्व खेळाडूंचे मी मनापासून कौतुक करतो आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो, असेही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

# श्रीक्षेत्र आळंदी यात्रेकरिता अनुदान वाढीसाठी मुख्यमंत्र्यांना साकडे : आमदार महेश लांडगे

**पिंपरी-चिंचवड, ता. ९ :** श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या धार्मिक यात्रांसाठी आवश्यक खर्च वाढत असताना सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवण्याची मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी सविस्तर पत्र पाठवून आळंदी नगरपरिषदेवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे.



आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, आळंदी नगरपरिषदेला सध्या यात्राकराच्या स्वरूपात केवळ १ .६२ कोटी रुपयांचे अनुदान मिळते. मात्र, सन २०२३२४ या कालावधीत यात्रेसाठी नगरपरिषदेला तब्बल २.७३ कोटी रुपयांचा खर्च करावा लागला. परिणामी, सुमारे १ .११ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नगरपरिषदेच्या स्वतःच्या निधीतून करावा लागला आहे. त्यामुळे नगरपरिषदेवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

याच आर्थिक तणावामुळे नगरपरिषदेची वीज देयके आणि शासकीय पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याचेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. यात्रेच्या व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागते. मात्र सध्याचे अनुदान या खर्चासाठी अपुरे ठरत असल्याने नगरपरिषदेला वारंवार स्वतःच्या निधीवर ताण येत आहे.

दरम्यान, संतश्रेष्ठ महाराजांचा संजीवनसमाधी सोहळा होणार असून, या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी श्रीक्षेत्र आळंदी येथे येणार आहेत. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार लांडगे यांनी अधोरेखित केले आहे. आळंदी नगरपरिषद प्रशासनानेही यासंदर्भात राज्य शासनाच्या नगरपरिषद संचालनालयाकडे अनुदान वाढीचा प्रस्ताव पाठवला असल्याची माहिती त्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे कामकाज सुरळीत आणि सक्षमपणे चालण्यासाठी यात्रा अनुदानात वाढ करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> श्रीक्षेत्र आळंदी हे वारकरी संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र असून दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशयोजना आणि सुरक्षेसाठी नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवणे आवश्यक आहे. या संदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली असून, आळंदी नगरपरिषदेला सक्षमपणे काम करता यावे आणि भाविकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला विश्वास आहे.
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पिस्तुलाचा धाक दाखवून जबरी चोरी; मोक्का गुन्ह्यातील दोन फरार आरोपी गुन्हे शाखेकडून जेरबंद

**पुणे, ता. ९ :** पिस्तुलाचा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या मोक्का गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना पुणे गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने अटक केली आहे. संतोष सुरेश भालेराव (वय २१ रा. सोमेश्वरवाडी, पाषाण) आणि आकाश ऊर्फ आक्की संतोष देवकर (वय २०, रा. मोशी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



गंभीरगुन्हेतसेचमोक्काप्रकरणांतील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ७ मार्च २०२६ रोजी युनिट-४ गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांनी पथकाला आवश्यक सूचना दिल्या होत्या. गुन्हे प्रतिबंधक गस्तीदरम्यान पोलीस अंमलदार अजय गायकवाड आणि वैभव रणपिसे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार संतोष भालेराव हा आकुर्डी येथील रमाईनगर परिसरात येणार असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

दरम्यान, दुसऱ्या कारवाईत पोलीस अंमलदार विशाल इथापे व नागेशसिंग कुंवर यांना मिळालेल्या माहितीनुसार आकाश ऊर्फ आक्की देवकर हा औंध येथील इंदिरा वसाहत परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ कारवाई करत त्यालाही ताब्यात घेतले. पोलिस चौकशीत दोन्ही आरोपी चतुः श्रृंगी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३९७, ३६४(अ), ५०६ तसेच शस्त्र कायदा आणि महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत वाँटेड असल्याचे उघड झाले. दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक वैभव मगदुम व त्यांच्या पथकाने केली.

# उरुळी कांचन येथे रस्ता ओलांडताना बल्करची धडक; एकाचा जागीच मृत्यू, बल्करचालक ताब्यात

**उरुळी कांचन, ता. ९ :** पुणे-सोलापूर महामार्ग ओलांडताना भरधाव बल्करच्या भीषण धडकेत एका व्यक्तीचा कुटुंबासमोरच जागीच मृत्यू झाला. रविवारी (ता. ०८) मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील तळवडी चौकात पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर हा अपघात झाला. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

उत्तम बबन भंडारे (वय -५३, रा. शिंदवणे चौक, उरुळी कांचन) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. अपघात एवढा भीषण होती की बल्कर वाहनाचे टायर थेट त्यांच्या डोक्यावरून गेल्याने डोक्याचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आणि त्यांचा कुटुंबासमोरच जागीच मृत्यू झाला. तर या अपघात प्रकरणी बल्कर ट्रक (एमएच १२ एसएक्स ८९८५) चालक प्रणव प्रदीप शिंदे (वय २०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रिती मयूर शेंबेकर (वय - ३०, धंदा गृहिणी रा. दुर्गा कॉलनी, डांगे चौक, चिंचवड) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन येथील ग्रामदैवत काळभैरवनाथाची जत्रा सुरु आहे. उत्तम भंडारे हे आपल्या कुटुंबियांसमवेत मुलगी व लहान मुलासह उरूस पाहण्यासाठी आले होते. उरूस आटोपल्यानंतर ते घरी परत जात असताना शिंदवणे चौकाजवळ महामार्ग ओलांडत होते. सोलापूरकडे जाणारी बाजू त्यांनी पहिला रस्ता सुरक्षितपणे पार केला. मात्र दुसरा रस्ता ओलांडताना सोलापूरहून पुण्याकडे भरधाव वेगाने येणाऱ्या बल्करने पुढे चालत असलेल्या भंडारे यांना जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की वाहनाचे टायर थेट त्यांच्या डोक्यावरून गेल्याने डोक्याचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आणि त्यांचा कुटुंबासमोरच जागीच मृत्यू झाला. वडिलांचा डोळ्यांसमोर झालेला मृत्यू पाहून मुलगी व लहान मुलगा हादरून गेले. या घटनेने परिसरात शोककळा पसरली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच कदम रुग्णवाहिकेचे वैभव कदम यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली मात्र डोक्यावरून चाक गेल्याने डोक्याचा अक्षरशः चेंदामेंदा झाला व मृतदेह हा छिन्नविछिन्न अवस्थेत पडला होता. सदरची माहिती उरुळी कांचन पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार वाहतूक कोंडी सोडवून पोलिसांनी बल्कर चालकाला ताब्यात घेतले.

दरम्यान, याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात चालक प्रणव शिंदे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब), १०६ (१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार भोसले करीत होते.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



## त्रिफळा चूर्ण आपल्या आरोग्यासाठी का महत्त्वाचे मानले जाते

त्रिफळा पावडर ही आयुर्वेदात सर्वात जास्त वापरली जाणारी हर्बल औषध आहे. ती प्रामुख्याने तीन प्रकारच्या औषधी वनस्पतींचे मिश्रण करून तयार केली जाते. ती अनेक रोग बरे करते आणि शरीराला निरोगी बनवते, म्हणूनच आयुर्वेदात त्रिफळा पावडरचा वापर सर्वात जास्त केला जातो. त्रिफळा पावडर, ज्याला पॉलिहर्बल उत्पादन म्हणूनही ओळखले जाते, त्यात आवळा, बहेडा आणि हद्रा (हरिताकी) यांचा समावेश आहे. त्यात कार्बोहायड्रेट्स, जीवनसत्त्वे, खनिजे, सोडियम आणि आहारातील फायबर, शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स गॅलिक ॲसिड आणि चेबुलजिक ॲसिड असतात. क्वेर्सेटिन आणि ल्युटोलिन, सॅपोनिन्स, अँथ्राक्विनोन्स, अमिनो ॲसिड आणि फॅटी ॲसिडसारखे बायोएक्टिव्ह फ्लेव्होनॉइड्स देखील आढळतात.

त्रिफळा पावडरमध्ये अँटीऑक्सिडंट, अँटी-इंफ्लेमेटरी, गॅस्ट्रिक हायपरॲसिडिटी-कमी करणारे, अँटीपायरेटिक, वेदनाशामक, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीम्युटेजेनिक गुणधर्म आहेत. त्यात हायपोग्लाइसेमिक, अँटीकॅन्सर, हेपेटोप्रोटेक्टिव्ह, केमोप्रोटेक्टिव्ह आणि रेडिओप्रोटेक्टिव्ह गुणधर्म देखील आहेत.

**त्रिफळा पावडर किती फायदेशीर आहे?**

त्रिफळा अन्नाचे योग्य पचन आणि शोषण देखील करू शकते. ते सीरम कोलेस्टेरॉलची पातळी कमी करू शकते. ते रक्ताभिसरण सुधारू शकते. ते पित्त नलिकांना आराम देऊ शकते. ते होमिओस्टॅसिस राखू शकते. त्रिफळा गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आरोग्यासाठी वापरण्यासाठी सर्वात प्रसिद्ध आहे. त्रिफळा पाण्यासारखा आणि अल्कोहोल-आधारित दोन्ही अर्क अतिसार रोखतात.

प्राण्यांवर केलेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, त्रिफळा थंडीमुळे होणाऱ्या ताणापासून संरक्षण करते. ते ताणामुळे होणाऱ्या वर्तनात्मक आणि जैवरासायनिक बदलांना देखील कमी करते, जसे की लिपिड पेरोक्सिडेशन आणि वाढलेले कॉर्टिकोस्टेरॉन पातळी. त्याचे अँटीऑक्सिडंट गुणधर्म देखील ताण कमी करू शकतात.

प्राण्यांवर केलेल्या अभ्यासात, लठ्ठ उंदरांना १० आठवडे त्रिफळा देण्यात आला. यामुळे शरीरातील चरबी जमा होणे आणि वजन कमी होणे कमी झाले. त्यामुळे कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराइड्स आणि कमी घनतेचे लिपोप्रोटीन कोलेस्टेरॉल देखील कमी झाले. मधुमेहाच्या औषधांसोबत त्रिफळा घेतल्याने उपवास रक्तातील साखर आणि उपवास सीरम इन्सुलिनची पातळी देखील कमी झाली.

# शिरूर पंचायत समितीवर राष्ट्रवादीचे वर्चस्व

## सभापतीपदी स्वाती घावटे तर उपसभापतीपदी रामराव सासवडे बिनविरोध

**पोपटराव पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ९ : जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या शिरूर पंचायत समितीच्या सभापतीपदी स्वाती विठ्ठल घावटे तर उपसभापतीपदी रामराव बबनराव सासवडे यांची सोमवारी बिनविरोध निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत असल्याने दोन्ही पदांवर पक्षाचे उमेदवार निवडून येतील, हे आधीच निश्चित मानले जात होते.

मागील महिन्यात झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आठ जागा जिंकत बहुमत मिळवले होते. भारतीय जनता पक्षाचे पाच सदस्य तर एक अपक्ष सदस्य निवडून आला होता. मात्र अपक्ष सदस्य कोमल ढेरंगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा दिल्याने





पंचायत समितीत राष्ट्रवादीचे संख्याबळ नऊवर पोहोचले आणि पदाधिकारी निवडीत राष्ट्रवादीचा मार्ग मोकळा झाला.

सोमवारी सभापती-उपसभापती निवडीपूर्वी शिरूर खरेदी विक्री संघाच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ सदस्यांची बैठक झाली. या बैठकीस शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, माजी आमदार ॲड. अशोक पवार, पक्षनिरीक्षक व जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद बुट्टे पाटील तसेच जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बंद पाकिटातून पाठविलेली नावे पक्षनिरीक्षक बुट्टे पाटील यांनी जाहीर केली. त्यात स्वाती घावटे यांचे सभापतीपदी तर रामराव सासवडे यांचे उपसभापतीपदी नाव घोषित करण्यात आले. यावेळी सर्व नऊ सदस्यांना विभागून संधी देण्यात येणार असल्याचे आमदार कटके व माजी आमदार पवार यांनी जाहीर केले. यानंतर पंचायत समिती सभागृहात पदाधिकारी निवड प्रक्रियेदरम्यान सभापतीपदासाठी राष्ट्रवादीकडून स्वाती घावटे तर भाजपकडून गटनेत्या मनिषा पाचंगे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. उपसभापतीपदासाठी राष्ट्रवादीकडून रामराव सासवडे तर भाजपकडून सागर देवकर यांनी अर्ज भरला होता. मात्र अर्ज माघारीच्या मुदतीत भाजप उमेदवारांनी माघार घेतल्याने दोन्ही पदांवर राष्ट्रवादी उमेदवारांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी व गटविकास अधिकारी महेश डोके यांनी अधिकृत घोषणा केली.

निवडीनंतर सभापती घावटे आणि उपसभापती सासवडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी माजी आमदार पोपटराव गावडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, तालुकाध्यक्ष रविंद्र काळे व राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते दीपक पवार, जिल्हा दूध संघाच्या संचालिका केशर पवार, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, माजी सदस्य राहुल पाचर्णे, रेखा बांदल, चंद्रशेखर पाचुंदकर, राजेंद्र नरवडे, माजी सभापती विश्वास कोहकडे, दादासाहेब कोळपे, प्रकाश पवार, शशिकांत दसगुडे, राजेंद्र जासूद, अरुण घावटे, विठ्ठल घावटे, सतीश पाचंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, जवळपास पावणे तीन वर्षांनंतर शिरूर पंचायत समितीला नवे पदाधिकारी मिळाल्याने तालुक्यातील राजकीय वातावरणात नवचैतन्य निर्माण झाले आहे.


### बिनविरोध निवड अजित पवार यांना समर्पित

सभापती स्वाती घावटे व उपसभापतीपदी रामराव सासवडे म्हणाले, या बिनविरोध निवडी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना समर्पित करण्यात येत असून सर्व सदस्यांना सोबत घेऊन पंचायत समितीच्या विकासकामांना गती देण्याचा संकल्प व्यक्त केला.

# पुणे जिल्ह्यात बेकायदेशीर पान टपऱ्यांचा सुळसुळाट; कारवाईची मागणी : चंद्रकांत वारघडे

**लोणी काळभोर, ता. ९ :** पुणे शहर तसेच पुणे जिल्ह्यातील रस्ते, हायवे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर पान टपऱ्यांचा सुळसुळाट झाल्याचे चित्र समोर आले आहे. या टपऱ्यांमधून नशिले पान, तंबाखूजन्य पदार्थ आणि आरोग्यास अपायकारक वस्तूंची सर्रास विक्री होत असल्याने विशेषतः शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचा धोका वाढत असल्याची गंभीर चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक, पुणे शहराचे पोलिस आयुक्त, पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक, झोन क्रमांक



७ चे पोलिस उपायुक्त, तसेच वाघोली आणि लोणिकंद पोलिस ठाण्यांचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, अनेक ठिकाणी विना परवाना पान टपऱ्यांद्वारे तंबाखूजन्य पदार्थांची खुलेआम विक्री केली जात आहे. ही विक्री सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम २००३, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच भारतीय दंड संहिता कलम २६८, २६९ व २७० या कायद्यांचे स्पष्ट उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी असतानाही अनेक ठिकाणी नियम धाब्यावर बसवून विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व बेकायदेशीर पान टपऱ्यांवर पोलिस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्त मोहीम राबवून तपासणी करावी व संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वारघडे यांनी केली आहे. तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विशेष मोहिमा राबवून अल्पवयीन विद्यार्थ्यांना नशेच्या पदार्थांपासून संरक्षण देणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, वाढत्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर हा सामाजिकदृष्ट्या गंभीर प्रश्न असून प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



## सिंहगड घाटात टेम्पो १५० फुटखोल दरीत कोसळला; पाच जण बचावले

**सिंहगड, ता. ९ :** पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या घाट रस्त्यावर काल संध्याकाळच्या सुमारास एक थरारक अपघात घडला. लाकडाची वाहतूक करणारा एक मालवाहू टेम्पो कोंढणपूर मार्गे सिंहगड -डोणजेच्या दिशेने येत असताना, एका अवघड वळणावर चालकाचा ताबा सुटला. नियंत्रण सुटलेला हा टेम्पो रस्त्याच्या कडेची लोखंडी सुरक्षा जाळी तोडून तब्बल १०० ते १५० फुट खोल दरीत कोसळला. मिळालेल्या माहितीनुसार, या टेम्पोमध्ये एकूण ५ जण प्रवास करत होते. सुदैवाने, टेम्पो दरीत कोसळत असतानाच सर्वांनी प्रसंगावधान राखून बाहेर उड्या मारल्या. यामुळे जीवितहानी टळली आहे. या अपघातात ३ जण किरकोळ जखमी झाले असून २ जण पूर्णपणे सुखरूप आहेत. या घटनेची माहिती मिळताच सिंहगड वनविभागाचे परिमंडळ अधिकारी समाधान पाटील यांनी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर जखमींना खोल दरीतून बाहेर काढत रुग्णवाहिकेतून जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.



## संजय शिरसाटांच्या सामाजिक न्याय विभागात घोटाळ्याचा आरोप

**ठाणे, ता. ९ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अविनाश जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिलंय. त्यात सामाजिक न्याय विभागातील अनियमितता आणि प्रशासकीय घोळांची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केलीय. विभागातील निधी वितरण, टेंडर प्रक्रिया आणि मंत्री कार्यालयातील काही अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत गंभीर संशय व्यक्त करत त्यांनी या प्रकरणात तातडीने चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली. या पत्रात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यालयातील खाजगी सचिव भरत कदम यांच्यावरही आरोप करण्यात आलेत. तसेच विभागात ओएसडी म्हणून काम करणारे सिद्धार्थ भंडारे हे कोणत्याही अधिकृत आदेशाविना कार्यरत असल्याचा संशयही अविनाश जाधव यांनी व्यक्त केलाय. या सर्व प्रकरणांमुळे सामाजिक न्याय विभागातील प्रशासन आणि निधी वितरण प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलीय.

## दगडाच्या ढिगाऱ्यात नग्नावस्थेत आढळला तरुण

**सासवड, ता. ९ :** पुरंदर तालुक्यातील खळद येथील गोटेमाळ परिसरात १४ फेब्रुवारीला रक्ताच्या थारोळ्यात सापडलेल्या त्या अज्ञात तरुणाचा मृत्यू हा अपघात नसून, थंड डोक्याने केलेला 'क्रूर खून' असल्याचे आता पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. सुरुवातीला हा नैसर्गिक मृत्यू वाटणाऱ्या या घटनेने आता गुन्हेगारी वळण घेतल्याने असंपूर्ण सासवड परिसरात खळबळ उडाली आहे.

व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी, ३३ वर्षीय मिश्रीलाल छोटेलाल (रा. उन्नाव, उत्तर प्रदेश) हा तरुण विवस्त्र आणि गंभीर जखमी अवस्थेत दगडांच्या ढिगाऱ्यात सापडला होता. सासवड पोलिसांनी त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले, मात्र आठवडाभर मृत्यूशी झुंज दिल्यानंतर २२ फेब्रुवारीला त्याचा प्राण गेला. ६



मार्च रोजी प्राप्त झालेल्या शवविच्छेदन अहवालाने पोलिसांनाही धक्का दिला. मिश्रीलालच्या डोक्यावर वर्मी घाव घालून त्याची हत्या करण्यात आली होती.

गुन्हेगारांनी केवळ हत्या केली नाही, तर ओळख पटू नये म्हणून त्याला विवस्त्र केले आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह दगडांच्या ढिगाऱ्यात लपवला. हा अपघात नसून पूर्वनियोजित कट असण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## टी -२० विश्वचषकात भारताने विजय मिळविल्यानंतर पुण्यात तरुणाईचा जल्लोष

**पुणे, ता. ९ :** टी -२० विश्वचषकात भारताने न्यूझीलंडवर एकतर्फी विजय मिळविल्यानंतर रविवारी शहरभर जल्लोष करण्यात आला. आतषबाजी, एकमेकांना पेढे भरवून पुणेकरांनी विजयाचा आनंद द्विगुणीत केला. डेक्कन जिमखाना, लष्कर, कोरेगाव पार्क भागात जल्लोष करण्यात आला.


विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारताने सुरुवातीपासून पकड ठेवली होती. शहरातील विविध सार्वजनिक मंडळांनी क्रीडाप्रेमींसाठी मोठ्या पडद्यावर अंतिम सामन्याचे थेट प्रक्षेपण केले. चौकाचौकात ध्वनीवर्धक लावण्यात आले होते. न्यूझीलंड विजय मिळवल्यानंतर तरुणाईने जल्लोष केला. चौकात ध्वनीवर्धकावर लावलेल्या गीतांवर नृत्य केले. तिरंगा फडकावून जल्लोष करण्यात आला. विजयाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अनेक जण नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौक (गुडलक चौक), जंगली महाराज रस्ता, लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता परिसरात जमले. तरुणांनी चौकात ध्वज फडकावून जल्लोष केला.



शहरातील विविध उपाहारगृहात ग्राहकांसाठी अंतिम सामन्याचे प्रक्षेपण करण्यात आले. एरंडवणे, कोरेगाव पार्क, लष्कर भागातील उपाहारगृह परिसरात गर्दी झाली होती. रात्री शहरातील प्रमुख चौकात जल्लोष करण्यात आला. डेक्कन जिमखाना, लष्कर, कोरेगाव पार्कसह शहरातील वेगवेगळ्या भागात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. जल्लोषाला गालबोट लागू नये शहर, उपनगरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली.

## दौंड पंचायत समितीच्या सभापतीपदी सुखदेव चोरमले तर उपसभापतीपदी अमृता गिरमकर

**दौंड, ता. ९ :** दौंड पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडणुकीत ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेसने माघार घेतल्याने राजकीय समीकरणांना अचानक कलाटणी मिळाली. या घडामोडीनंतर पंचायत समितीवर भाजपचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले असून सभापतीपदी सुखदेव सोनबा चोरमले आणि उपसभापतीपदी अमृता अभिमन्यू गिरमकर यांची बिनविरोध निवड झाली.



सभापतीपदासाठी भाजपकडून सुखदेव चोरमले तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रदीप किसन दिवेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तसेच उपसभापतीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून मनिषा संतोष ताकवणे आणि भाजपकडून अमृता गिरमकर यांनी अर्ज भरला होता. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार की बिनविरोध, याकडे तालुक्याचे लक्ष लागले होते.

मात्र उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम मुदतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदीप दिवेकर यांनी सभापतीपदाचा आणि मनिषा ताकवणे यांनी उपसभापतीपदाचा अर्ज मागे घेतला. परिणामी दोन्ही पदांवर भाजप उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली. निवडणुकीत पंचायत समितीत भाजपचे ८ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ सदस्य निवडून आले होते. राष्ट्रवादीने माघार घेतल्यानंतर भाजपने पंचायत समितीवर आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी अधिकृत निकाल जाहीर केला.

दरम्यान, निवड जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नवनिर्वाचित सभापती सुखदेव चोरमले आणि उपसभापती अमृता गिरमकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.

# भोर पंचायत समितीत राष्ट्रवादीच्या मनिषा कंक ईश्वरी चिठ्ठीने सभापती तर विशाल कोंडे उपसभापती

**इम्रान आत्तार**

### आमदार संग्राम थोपटे यांना सलग तिसरे अपयश

भोर, ता. ९ : भोर पंचायत समितीच्या सभापती निवडणुकीत नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. संख्याबळ समान असल्याने अखेर ईश्वरी चिठ्ठी काढून निर्णय घ्यावा लागला आणि त्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या मनिषा कंक यांच्या नावे चिठ्ठी निघाल्याने त्यांची सभापतीपदी निवड निश्चित झाली. तर उपसभापतीपदी विशाल कोंडे यांची निवड झाली. या निकालामुळे तालुक्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात जल्लोषाचे वातावरण आहे.

भोर पंचायत समितीचे सभापतीपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने निवडणुकीत चार महिला उमेदवार रिंगणात होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसकडून तृप्ती खुटवड आणि मनिषा कंक, तर भाजपकडून गीता आंबवले आणि सुषमा चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पंचायत समितीत एकूण आठ सदस्य असून राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षांचे चार-चार सदस्य असल्याने संख्याबळ पूर्णपणे समसमान झाले होते.

या परिस्थितीत मतदानानंतरही स्पष्ट निकाल लागणे शक्य नसल्याने अखेर ईश्वरी चिठ्ठीचा पर्याय स्वीकारण्यात आला. या चिठ्ठीत मनिषा कंक यांच्या नावे चिठ्ठी



निघाल्याने त्यांची सभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत विजय साजरा केला.

दरम्यान, या निकालामुळे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या गटाला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर त्यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र त्यानंतर झालेल्या भोर नगरपालिका निवडणुकीतही अपेक्षित यश मिळाले नाही. त्या निवडणुकीत आमदार शंकर मांडेकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने अध्यक्षपद मिळवले होते.

आता पंचायत समितीचे सभापतीपदही राष्ट्रवादीच्या गळ्यात पडल्याने भोर तालुक्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलली आहेत. या विजयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुक्यातील राजकीय बळ अधिक मजबूत झाले असून आमदार शंकर मांडेकर यांचे राजकीय वजन वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

विधानसभा निवडणुकीमध्ये थोपटेंना पराभवाचा धक्का सहन करावा लागल्यानंतर त्यांनी काँग्रेस मधून भाजपमध्ये प्रवेश केला आणि त्यांच्या नेतृत्वात भोर नगरपालिका निवडणूक लढली गेली त्या निवडणुकीमध्ये देखील मांडेकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष निवडून आला होता. त्यानंतर आता भोर पंचायत समिती वर देखील राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असणार आहे.